प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

नोव्हेंबर 30, 2018

**बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या (एएसीएस) कलम 35अ खाली दिलेले निर्देश - दि मराठा सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र**

दि मराठा सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना ऑगस्ट 31, 2016 रोजीचे व्यवहार बंद झाल्यापासून, निर्देश दि. ऑगस्ट 31, 2016 अन्वये निर्देशांखाली ठेवण्यात आले होते. ह्या निर्देशांची वैधता संबंधित निर्देशांद्वारे वेळोवेळी वाढविण्यात आली होती व शेवटचा निर्देश ऑगस्ट 24, 2018 रोजीचा असून तो निर्देश, पुनरावलोकनाच्या अटीवर, नोव्हेंबर 30, 2018 पर्यंत वैध होता.

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35अ च्या पोटकलम (1) खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँक येथे निर्देश देत आहे की, वेळोवेळी सुधारित केलेले ऑगस्ट 31, 2016 चे व शेवटून दि. नोव्हेंबर 30, 2018 पर्यंत वैधता वाढविण्यात आलेले वरील बँकेला दिलेले निर्देश, नोव्हेंबर 27, 2018 रोजीच्या निर्देशान्वये, त्या बँकेला, पुनरावलोकनाच्या अटीवर आणखी चार महिन्यांसाठी, म्हणजे, डिसेंबर 1, 2018 ते मार्च 31, 2019 पर्यंत लागु असतील.

वरील मुदतवाढ अधिसूचित करणा-या निर्देश दि. नोव्हेंबर 27, 2018 ची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व बँकेने दिलेली वरील मुदतवाढ आणि/किंवा बदल ह्याचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1253**